# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**(जाहिरात क्र. ०७/२०१९)**

Estd : 1962
NAAC "A" Grade

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ अन्वये कलम २३ (क) व (ख) नुसार आणि महाराष्ट्र शासन यांनी दि. १० ऑक्टोबर, २०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या एकरूप परिनियम क्रमांक १ व २ नुसार शिवाजी विद्यापीठाकडील संचालक, विद्यार्थी विकास आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदांसाठी अर्ज मागवून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करावयाची आहे.

वरील पदांसाठी इच्छूक उमेदवारांनी याबाबतची अधिकची माहिती विद्यापीठ संकेतस्थळ www.unishivaji.ac.in येथील Recruitments या लिंक वरून प्राप्त करून घ्यावी व ऑनलाईन अर्ज दि. १८ जून, २०१९ पर्यंत भरावा.

तरी पात्र इच्छुक उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या प्राचार्य / संचालक/ अधिविभागप्रमुख यांच्या मार्फत ऑनलाईन अर्जाची छापील प्रत/ Hard Copy दि. २२ जून, २०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नांवे विद्यापीठ कार्यालयास पोष्टाने अथवा स्व:हस्ते सादर करावेत.

कोल्हापूर.
दिनांक - २९/०५/२०१९

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## (जाहिरात क्र. ०७/२०१९)

Estd. 1962
NAAC "A" Grade

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयाच्या / संस्थेच्या प्राचार्यांना / संचालकांना आणि विद्यापीठामधील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांना आदेशान्वये कळविणेत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २३ (क) व (ख) आणि महाराष्ट्र शासन यांनी दि. १० ऑक्टोबर, २०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या एकरूप परिनियम क्रमांक १ व २ अन्वये शिवाजी विद्यापीठामध्ये संचालक, विद्यार्थी विकास व संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांची नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करावयाची आहे.

**संचालक, विद्यार्थी विकास : Post Code 07/2019 -01**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार आणि एकरूप परिनियम क्रमांक १ नुसार सदर पदाकरिता आवश्यक अर्हता, वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती या खालीलप्रमाणे असतील.

१. **नामनिर्देशन प्रक्रिया** - मा. कुलगुरू पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवील आणि त्यांच्यामधून एका योग्य व्यक्तीला संचालक, विद्यार्थी विकास म्हणून तीन वर्षांच्या पदावधीकरिता, जो आणखी एका मुदतीसाठी नवीकृत करता येईल-नामनिर्देशित करील. याबाबत मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ सदर पदावर प्रतिनियुक्त झालेल्या व्यक्तिच्या जागी दुसऱ्या व्यक्तिची नेमणूक त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या निकषानुसार करू शकेल.

२. **अर्हता** - संचालक, विद्यार्थी विकास या पदाकरिता अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षाचा अनुभव असणाऱ्या आणि अभ्यासेत्तर व विस्तार कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून कुलगुरूकडून नामनिर्देशित करण्यात येईल. तो कुलगुरूच्या थेट अधीक्षणाखाली, निदेशनाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

३. **वित्तलब्धी** - संचालक, विद्यार्थी विकास म्हणून नामनिर्देशित केलेली व्यक्ती संचालक, विद्यार्थी विकास म्हणून तिचे नामनिर्देशन केल्याच्या दिनांकास तिच्या पूर्वीच्या सेवेत असताना तिला जितकी वित्तलब्धी व वेतनमान मिळत असेल तितकी वित्तलब्धी व वेतनमान मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ याकडून मिळण्यास हक्कदार असेल.

४. **वय** - संचालक, विद्यार्थी विकास या पदाच्या नामनिर्देशनासाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराचे वय हे नामनिर्देशनाच्या वेळेस ५० वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

५. **सेवेच्या अटी व शर्ती** - (१) संचालक, विद्यार्थी विकास याच्या सेवेच्या अटी व शर्ती हया, त्याच्या मूळ पदाच्या अटी व शर्तीप्रमाणेच असतील आणि संचालक, विद्यार्थी विकास म्हणून त्याच्या पदावधीदरम्यान त्याला अहितकारक होईल अशा प्रकारे त्या बदलता येणार नाहीत.

(२) संचालक, विद्यार्थी विकास म्हणून नामनिर्देशन झाल्यावर, त्याच्या मूळ पदावर त्याने घेतलेले अंतिम वेतन संरक्षित केले जाईल.

Cont ...

(३) संचालक, विद्यार्थी विकास म्हणून नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीचा, नामनिर्देशनापूर्वी तिने धारण केलेल्या कायम पदावर धारणाधिकार असेल आणि त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार तो तिच्या मूळ पदावरून सेवानिवृत्त झाल्याप्रमाणे असेल.

(४) संचालक, विद्यार्थी विकास हा थेट कुलगुरूंच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

(५) संचालक, विद्यार्थी विकास यास कुलगुरूला उद्देशून एक महिन्याची नोटीस देऊन आपल्या पदाचा लेखी स्वरूपात त्याच्या स्वाक्षरीने राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून यापैकी जे अगोदर घडेल तेंव्हापासून त्याचे पद धारण करण्याचे बंद होईल.

(६) संचालक, विद्यार्थी विकास यास कुलगुरूकडून एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येईल.

## संचालक, राष्ट्रीय सेवा योजना : Post Code 07/2019 -02

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार आणि एकरूप परिनियम क्रमांक २ नुसार सदर पदाकरिता आवश्यक अर्हता, वित्तलब्धी, पदावधी आणि सेवेच्या अटी व शर्ती या खालीलप्रमाणे असतील.

१. **नामनिर्देशन प्रक्रिया** - मा. कुलगुरू पात्र इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवील आणि त्यांच्यामधून एका योग्य व्यक्तीला संचालक, राष्ट्रीय सेवा योजना म्हणून तीन वर्षांच्या पदावधीकरिता, जो आणखी एका मुदतीसाठी नवीकृत करता येईल-नामनिर्देशित करील. याबाबत मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ सदर पदावर प्रतिनियुक्त झालेल्या व्यक्तिच्या जागी दुसऱ्या व्यक्तिची नेमणूक त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या निकषानुसार करू शकेल.

२. **अर्हता** - संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदाकरिता अध्यापनाचा किमान एकूण दहा वर्षाचा अनुभव असणाऱ्या, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून किमान तीन वर्षाचा अनुभव असणाऱ्या आणि राष्ट्रीय सेवा योजना कृतिकार्यक्रम क्षेत्रामध्ये समाधानकारक कामगिरी पार पाडलेल्या अध्यापकांमधून कुलगुरूकडून नामनिर्देशित करण्यात येईल.

३. **वित्तलब्धी** - संचालक, राष्ट्रीय सेवा योजना म्हणून नामनिर्देशित केलेली व्यक्ती संचालक, राष्ट्रीय सेवा योजना म्हणून तिचे नामनिर्देशन केल्याच्या दिनांकास तिच्या पूर्वीच्या सेवेत असताना तिला जितकी वित्तलब्धी व वेतनमान मिळत असेल तितकी वित्तलब्धी व वेतनमान मूळ महाविद्यालय किंवा मूळ मान्यताप्राप्त परिसंस्था किंवा मूळ विद्यापीठ याकडून मिळण्यास हक्कदार असेल.

४. **वय** - संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदाच्या नामनिर्देशनासाठी इच्छुक असलेल्या उमेदवाराचे वय हे नामनिर्देशनाच्या वेळेस ५० वर्षापेक्षा जास्त असणार नाही.

Cont ...

**सेवेच्या अटी व शर्ती** - (१) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना याच्या सेवेच्या अटी व शर्ती हया, त्याच्या मूळ पदाच्या अटी व शर्तीप्रमाणेच असतील आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना म्हणून त्याच्या पदावधीदरम्यान त्याला अहितकारक होईल अशा प्रकारे त्या बदलता येणार नाहीत.

(२) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना म्हणून नामनिर्देशन झाल्यावर, त्याच्या मूळ पदावर त्याने घेतलेले अंतिम वेतन संरक्षित केले जाईल.

(३) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना म्हणून नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीचा, नामनिर्देशनापूर्वी तिने धारण केलेल्या कायम पदावर धारणाधिकार असेल आणि त्या पदाच्या सेवेच्या अटी व शर्तीनुसार तो तिच्या मूळ पदावरून सेवानिवृत्त झाल्याप्रमाणे असेल.

(४) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना हा थेट कुलगुरूंच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करील.

(५) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यास कुलगुरूला उद्देशून एक महिन्याची नोटीस देऊन आपल्या पदाचा लेखी स्वरूपात त्याच्या स्वाक्षरीने राजीनामा देता येईल आणि कुलगुरूने त्याचा राजीनामा स्वीकारल्यावर किंवा उक्त नोटिशीचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून यापैकी जे अगोदर घडेल तेंव्हापासून त्याचे पद धारण करण्याचे बंद होईल.

(६) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यास कुलगुरूकडून एक महिन्याची लेखी नोटीस देऊन त्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येईल.

तरी उपरोक्त दोन्ही परीनियमानुसार संचालक, विद्यार्थी विकास आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना या पदांसाठी पात्र इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दि. १८ जून, २०१९ पर्यंत भरून त्याची छापील प्रत / Hard Copy दि. २२ जून, २०१९ पर्यंत मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नावे आवश्यक त्या कागदपत्रांसहित आपल्या प्राचार्य / संचालक / अधिविभागप्रमुख यांच्या मार्फत सादर करावी. याकरिता रू. ५००/- इतकी फी रोखीने अथवा मा. वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे धनादेश/धनाकर्षद्वारे अर्जासोबत जमा करावे. ऑनलाईन अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in वर ठेवणेत आला आहे. सदर पदासाठीचा अर्ज दिलेल्या मुदतीमध्ये विद्यापीठ कार्यालयास स्व:हस्ते अथवा पोष्टाने पाठवून द्यावा.

स्थळ: कोल्हापूर
दिनांक : २९/०५/२०१९.

**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**